***कामाचे स्वरूप कंपनीने ठरवून दिलेले नॉर्म***

**-यातून फायदा कसा होणार आहे ?**

प्रत्येक बी2बी दुकान ,कंपनी ,ऑफिस रजिस्ट्रेशन पोटी पैसे मिळतील, जसे की त्या दुकानाचे संपूर्ण नाव, त्याचे फोटो, प्रॉडक्टचे अपडेशन हे सर्व फिल्ड योग्यरीत्याने भरलेले असेल तर त्याचा मोबदला तुम्हाला मिळेल.

**-माहिती घ्यायला कधी जावे ?**

फक्त कार्यलाईन वेळेत आणि आमच्या ठिकाणी जावून कंपनी मालकाची पूर्वपरवणगी घेवून माहिती घ्यावी

**-याचे दर महिन्याला काही टार्गेट असणार का ?**

हो, दरमहा या कामाचे टार्गेट असेल परंतु जेवढे दुकानदार तुम्ही जोडताल ते तुम्हाला कंपनीने दिलेल्या कॅटेगिरी वाईज असावेत.

**-आम्ही आमच्या एजन्सी अंतर्गत या कामासाठी कोणाची नेमणूक करू शकतो का?**

हो, या कामासाठी किती लोकांना तुम्ही रोजगार उपलब्ध करून देता याचे पूर्ण अधिकार तुम्हाला आहेत.

**-पेमेंट मिळण्याची पद्धत कशी आहे ?**

एजन्सी मार्फत दुकानदारांची माहिती आल्यानंतर ते प्रिन्सिपल समन्वयचा **चावडी ट्रेनिंग अँड कन्सल्टन्सी प्रा ली** या कंपनीला जमा करावे लागतील, त्यानंतर एजन्सी धारकाने भरलेली माहिती योग्य आणि खरी आहे की नाही याची तपासणी करण्यासाठी हे सर्व दुकानदारांचे रजिस्ट्रेशन आमच्या चावडी तपासणी विभाग वेरिफिकेशन डिपार्टमेंट कडे सुपूर्त केले जातील, सर्व दुकानदार यांची माहिती जमा केल्यानंतर तीस दिवसांमध्ये दुकानदारानुसार माहिती तपासली जाईल संपूर्ण माहिती योग्य आणि खरी असेल तर लगेचच न हरकत देऊन त्याचा अहवाल अकाउंट डिपार्टमेंट कडे सुपूर्त केला जाईल, व त्यांनी तो कंपनीच्या माननीय डायरेक्टर यांच्याकडे अंतरिम मंजुरीसाठी दाखल करतील, त्यांनी बिलाला मंजुरी दिल्यास पुढील सात दिवसात पेमेंटचा चेक एजन्सीच्या नावे काढला जाईल.
या सर्व प्रक्रियेला कार्यालयीन वेळेप्रमाणे 30 ते 40 दिवसांचा अवधी लागेल.

**-जर माहिती चुकीची अथवा खोटी आढळल्यास**

मग मात्र एजन्सीचे पेमेंट थांबविण्याचा पूर्ण अधिकार कंपनीला राहील. 40% पेक्षा अधिक माहिती ही खोटी अथवा दिलेल्या प्रमाणे घेतलेली नसल्यास संपूर्ण रजिस्ट्रेशन प्रोसेस नाकारण्याचा अधिकार कंपनीस राहील. माहिती गोळा करण्यासाठी चे नियम व अटी माहिती प्रत्यक्ष स्वतः समोरासमोर जाऊन घ्यायची आहे.

फोनवरून अथवा इतर सूत्रद्वारे माहिती घेण्याची परवानगी नाही. असे तपासणी करताना आढळून आल्यास ती माहिती रद्द म्हणून गृहीत धरली जाईल, आणि त्या पोटी होणारे पॉईंट निगेटिव्ह मार्किंग प्रमाणे पूर्ण पॉईंट मधून वजा केले जातील.

माहिती गोळा करताना सर्वात अगोदर त्या व्यक्तीस उद्योजकास चावडी विषयी संपूर्ण माहिती सांगून त्यास आपले माहितीपत्रक देऊन त्याने सो इच्छेने परवानगी दिल्यानंतरच त्यास आपल्याकडे रजिस्टर करून घेता येईल.

दुकानदाराच्या माहिती मधील कोणतीही माहिती चुकीची अथवा खोटी आढळून आल्यास निगेटिव्ह मार्किंग प्रमाणे त्या फॉर्म पोठी पॉईंट मधून ती रक्कम वजा केली जाईल. परत तीच माहिती जमा करण्याचा अधिकार एजन्सीला असणार नाही. जर एका बॅच मधून 40% पासुन अधिक दुकानदारांची माहिती अशी चुकीची अथवा खोटी माहिती आढळून आल्यास त्या एजन्सी चा करार रद्द केला जाईल, आणि अशा परिस्थितीत त्याचे त्या बॅचचे पेमेंट संपूर्ण रद्द केले जाईल त्यास दिले जाणार नाही.

**-माझी कोणती कागदपत्रे यासाठी मला द्यावी लागतील**

- आधार कार्ड
- ओळखपत्र
- पॅन कार्ड
- Cancelled चेक
- अगोदर कुठे नोकरी करत असल्यास तेथील प्रमाणपत्र

**-जर मी जास्तीचे दुकानदार रजिस्ट्रेशन केले तर चावडी मला जास्तीचे उत्पादन देणार का ?**

हो, नक्कीच.

**-मी फक्त एकाच भागात काम करू शकतो, की कुठेही काम करू शकतो ?**

हो, तुम्हाला एरिया अलॉटमेंट चावडी कंपनीद्वारे दिला जाईल व तुम्ही त्याच एरियामध्ये काम करावे.

**-मी माझा जॉब करून हे काम करू शकतो का ?**

हो.

**-मी एकटा हे काम करू शकतो, की मला काही प्रतिनिधी यासाठी नियुक्त करावे लागतील, किंवा मी प्रतिनिधी नियुक्त करू शकतो का ?**

चावडी वेंडर टायप हा प्रकल्प तुम्हाला जास्तीचे उत्पादन मिळवून देण्यासाठी आहे, त्यामुळे तुम्ही एकटे सुद्धा काम करू शकता किंवा त्यासाठी तुम्ही तुमच्याकडे प्रतिनिधी सुद्धा नियुक्त करू शकता, त्यासाठी मात्र चावडी कडून कोणते अधिक उत्पन्न दिले जाणार नाही. प्रतिनिधी नियुक्त करण्याचा संपूर्ण अधिकार तुम्हाला असेल आणि त्याबाबतची सर्व जबाबदारी तुमची असेल.

**-चावडीच्या वेंडर टायप या प्रोसेस मध्ये शैक्षणिक पात्रता किंवा इतर पात्रता कोणत्या ?**

कोणत्याही शैक्षणिक पात्रतेची अट नाही, फक्त कमीत कमी 18 वर्षे वय पूर्ण केलेले असावे.

**-वेंडर रजिस्ट्रेशन कसे करावे ?**

याची योग्य पद्धत आणि त्यामागे मिळणारे पॉईंट, वेंडर चे रजिस्ट्रेशन वेबसाईटवर कसे योग्य पद्धतीने करावे याबाबत तुम्हाला डेमो, ट्रेनिंग दिले जाईल व तुम्हाला फिल्डवर काही अडचण आल्यास तुम्ही आमच्या कॉल सेंटरला कॉल करून आमच्या प्रतिनिधींशी चर्चा करू शकता.

तुम्हाला स्वत प्रत्यक्ष जावून स्वत माहिती घ्यायची आहे इंटरनेट वरुण किंवा इतर source मधून माहिती घेवून फॉर्म भरणे चालणार नाही .

उद्योजकाचा फॉर्म भरतेवेळी त्याचा मोबाइल वर OTP वेरफिकेशन करून घेणे बंधनकारक आहे तसेच त्याचे उद्यम किंवा शॉप ॲक्ट रजिस्ट्रेशन ची फोटो कॉपी फॉर्म सोबत Attachment म्हणून जोडावा लागेल आणि तरच तुम्ही स्वत जावून प्रत्यक्ष माहिती घेतली आहे असे गृहीत धरले जाईल .आणि तरच त्याचे पैसे तुम्हाला मिळतील

फ्री लिस्ट करण्यासाठी वेंडर कडून कोणत्याही स्वरूपात पैसे घेण्याची आवश्यकता नाही किंवा कोणताही व्यवहार करण्याची आवश्यकता नाही असे केल्यास तुमच्यावरती कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

जर कोणताही वेंडर पेड लिस्ट मध्ये जात असेल तर अशावेळी त्याला फक्त आणि फक्त कंपनी दिलेल्या अकाउंट वरती थेट ऑनलाईन आरटीजीएस एनएफटी आय एम पी एस किंवा नेट बँकिंग अथवा फोन पे गुगल पे किंवा चेक द्वारे पैसे देता येतील.

**Account Name -Chawadi training and consultancy pvt. ltd**

**Ac No: 4113057029**

**IFSC code- KKBK0001782**

**Bank-kotak Bank**

**Branch Yerwada, Pune**

**UPI ID- chawadi@kotak.**

**Google Pay / Phone Pay Number**

**9404963614**

कोणत्याही वेंडर चे पैसे फक्त कंपनीच्या याच खात्यावर किंवा नंबर द्वारे स्वीकारण्यात येतील.

तुम्ही तुमच्या खात्यावरती पैसे जमा करून घेणे किंवा इतर कोणता खाते क्रमांक देणे किंवा कॅश स्वरूपात हा आर्थिक आणि फसवणुकीचा गुन्हा समजला जाईल आणि तत्काळ तुमच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

कोणत्याही उद्योजकाचा दुकानदाराचा अथवा कंपनीचा फॉर्म भरून घेताना संपूर्ण माहिती भरून घेणे आणि ती ऑनलाईन सबमिट झाली का याची खात्री करून घेणे गरजेचे राहील
फॉर्म भरताना तुम्हाला तुमचा आयडी नंबर त्या फॉर्ममध्ये टाकणे गरजेचे राहील अन्यथा फॉर्म तुम्ही भरला आहे याची खात्री पटवणे अवघड जाईल आणि अशावेळी हा फॉर्म तुमच्याशी कनेक्ट न करता थेट सबमिट करून घेतला जाईल त्यामुळे अशावेळी तुम्हाला त्याचे पैसे मिळणार नाहीत त्यामुळे कोणताही फॉर्म भरला तर फॉर्म भरताना शेवटी त्या फॉर्मचा स्क्रीनशॉट काढून घेणे गरजेचे आहे.
नंतर हा स्क्रीन शॉट तुम्ही केलेले काम म्हणून पुरावा म्हणून गृहीत धरण्यात येईल.

कोणतीही कंपनी वेंडर दुकानदार ही पूर्वी जर आपल्याकडे रजिस्टर असेल तर पुन्हा त्यांना आपल्याकडे रजिस्टर करून घेता येणार नाही
एका व्यक्तीला दुकानदाराला कंपनीला फक्त एकदाच फ्री लिस्टिंग मध्ये आपल्याला फॉर्म भरून घेता येईल

जर तुम्ही अशा व्यक्तीचा पुन्हा पुन्हा फॉर्म भरला तर त्याचे एकदाच पैसे तुम्हाला मिळतील आणि यापूर्वीच जर कोणी त्यांचा फॉर्म भरला असेल तर मग मात्र तुम्हाला फॉर्म भरला तरी सुद्धा त्या बदल्यात पैसे मिळणार नाहीत.

कोणत्याही दुकानदाराला वेंडरला कंपनीला आपल्या फ्री लिस्टिंग उपक्रमात सहभागी करून घेण्यापूर्वी त्याचा फॉर्म आपण नक्की का भरून घेत आहोत नक्की चावडी कंपनी काय काम करते आणि या फ्री लिस्टिंगचा त्याला त्याच्या उद्योगात कसा फायदा होईल याबाबत संपूर्ण सविस्तर आणि तपशीलवार माहिती देणे जर वेरिफिकेशन करताना त्यांना चौकशी करण्यात आली आणि त्यांनी मी नेमका का फॉर्म भरला आहे याबाबत किंवा या संपूर्ण उपक्रमाबाबत काहीही माहिती नसेल तर अशावेळी तुमचा फॉर्म हा रिजेक्ट करण्यात येईल आणि त्याचे पैसे तुम्हाला मिळणार नाहीत.
आपण कंपनीचे पूर्णवेळ कर्मचारी नसल्याने हे काम करत असताना तुमचा कोणत्याही स्वरूपात एक्सीडेंट झाला किंवा कोणताही अपघात घडला किंवा इतर काही घटना घडली तर अशावेळी कोणताही मोबदला किंवा नुकसान भरपाई कंपनी तुम्हाला देणार नाही.

तुम्ही नियुक्त केलेले कर्मचारी यांच्याशी कोणताही थेट संबंध कंपनीचा राहणार नाही त्यामुळे तुमच्या किंवा त्यांच्या व्यक्तिगत आयुष्यात किंवा हे काम करत असताना कोणत्याही स्वरूपात एक्सीडेंट झाला किंवा कोणताही अपघात घडला किंवा इतर काही घटना घडली तर अशावेळी कोणत्याही प्रकारचा मोबदला किंवा नुकसान भरपाई कंपनी तुम्हाला देणार नाही.
हे काम करत असताना कोणत्याही प्रकारचे टीए, डीए अलाउन्स, मेडिकल अलाउन्स किंवा इतर भत्ते असे तुम्हाला काहीही मिळणार नाही.

फक्त प्रत्येक वेंडरचा दिलेल्या कॅटेगिरी नुसार जर योग्यरीत्या संपूर्ण माहितीसह आणि खरी माहिती सोबत त्याचे उद्योगाचे रजिस्ट्रेशन सर्टिफिकेट जसे की उद्योग किंवा शॉप ॲक्ट लायसन याचा फोटो आणि तुमचा त्या दुकानदार सोबतचा किंवा दुकानाबाहेरील चा सेल्फी फोटो या दोन गोष्टी अटॅचमेंट जोडल्यानंतर आणि दुसऱ्या दिवशी आमच्या लोकांनी वेरिफिकेशन केल्यावर संपूर्ण माहिती खरी आढळल्यास तुम्हाला प्रति फॉर्म सबमिशनचे शंभर रुपये देण्यात येतील.
फ्री लिस्टिंग चे काम करीत असताना कोणत्याही दुकानदाराकडे वेंडर कडे किंवा कंपनीमध्ये गेल्यावरती त्यांच्या पूर्व परवानगीशिवाय त्यांच्या येथील वस्तूंना सामानाला हात लावणे चोरण्याचा प्रयत्न करणे अथवा बाधा पोहोचवणे अशी कोणतीही घटना घडल्यास याला संपूर्ण तुम्ही जबाबदार असाल आणि त्याविषयी तुमच्यावरती कायदेशीर कारवाई करण्यात येईल याबाबत कंपनीचा कोणताही थेट संबंध असणार नाही.
तसेच कंपनी किंवा दुकानदाराच्या पूर्वपरवानगीशिवाय त्याच्याविषयी त्याच्या कंपनी विषयी माहिती इतर माध्यमाद्वारे गोळा करून फॉर्म भरण्याचा प्रयत्न केल्यास तो गुन्हा समजला जाईल.

दिलेला फॉर्म सोडून इतर कोणतीही माहिती विचारण्यास किंवा तसे कागदपत्र गोळा करण्यास किंवा इतर कोणतीही आर्थिक बाबीं बाबत माहिती विचारल्यास तुमच्यावरती कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

जर कोणत्याही दुकानदाराने किंवा कंपनीने आपले पेड लिस्टिंग घेतल्यास विविध प्लॅन प्रमाणे जीएसटी अमाऊंट सोडून प्लॅनच्या रकमेच्या वीस टक्के मार्जिन तुम्हाला कमिशन स्वरूपात दर महिन्याच्या पेमेंट मध्ये ॲड करून तुमच्या खात्यावरती जमा करण्यात येईल.
सर्वात महत्त्वाचे की बी टू सी कॅटेगिरी मधील दुकानदारांना आपल्या सोबत जोडून घेणे आणि त्यांचा फॉर्म भरणे गृहीत धरले जाणार नाही असा फॉर्म स्वीकारला जाणार नाही त्याचे पैसे मिळणार नाहीत

जसे की किराणा दुकान ,मेडिकल, ब्युटी पार्लर , बेकरी , चप्पल दुकान इत्यादी .रीटेल करणारी कोणताही दुकानदार आपल्याला free लिस्टिंग मध्ये जोडून घ्यायचा नाही.

आपण फक्त उत्पादन स्वत बनविणारा Manufacturer , Trader , Distributor , Stockiest यांना जोडून घ्यायचे आहे.

कोणत्या दुकानदारांना जोडून घ्यायचे आहे आणि कुणाला घ्यायचे नाही याबाबत तुम्हाला सर्व माहिती सांगितलेली आहे आणि तसा तपशील तुम्हाला ईमेल द्वारे पाठवला आहे. तसेच ही यादी तुम्हाला यापूर्वी दाखवलेली आहे आणि वेळोवेळी त्यामध्ये अनुभवानुसार अपडेट केले जात असतील ते तुम्ही सातत्याने बघणार आहात, त्यामुळे जर रिजेक्टेड लिस्ट मधून तुम्ही जर का दुकानदार रजिस्टर केले तर अशा कामाचे पैसे तुम्हाला मिळणार नाहीत.

टेलिफोनिक डिस्कशन द्वारे किंवा ऑनलाईन डेटाबेसच्या माध्यमातून कोणत्याही वेंडर कंपनीचा फॉर्म भरणे ग्राह्य धरले जाणार नाही. तुम्हाला प्रत्यक्ष दुकानदार, कंपनी, ऑफिसमध्ये जाऊन अगोदर चावडी ट्रेनिंग अँड कन्सल्टन्सीच्या चावडी कॉल सेंटर या उपक्रमाबाबत संपूर्ण व्यवस्थित माहिती देऊन फ्री लिस्टिंग आपण नक्की का करून घेत आहोत याबाबत

उद्देश समजून सांगून त्याचा त्या दुकानदारास काय फायदा होईल याबाबत माहिती देऊन मग समक्ष **Chawadi.com** वेबसाईट वरील फॉर्म द्वारे संपूर्ण माहिती भरून घ्यायची आहे तसेच तेथील फोटो आणि रजिस्ट्रेशनच्या दोन अटॅचमेंट अपलोड करून नंतर ओटीपी व्हेरिफाय करून फॉर्म सबमिट करायचा आहे. फॉर्म सबमिट करताना तुमचा दिलेला आयडी नंबर आवर्जून टाकणे गरजेचे आहे अन्यथा तुमचा फॉर्म तुमच्या खात्यामध्ये गृहीत धरला जाणार नाही आणि मग त्याचे पैसे तुम्हाला मिळणार नाहीत.

**-वेंडर रजिस्ट्रेशन करताना फोटोग्राफ कसा घ्यावा ?**

आपल्याकडे जर चांगल्या प्रतीचा मोबाईल असेल तर आपण दुकानदाराच्या मालकासोबत सेल्फी किंवा दुकान बाहेर तुमचा फोटो घेऊ शकता व ते तुम्ही रजिस्ट्रेशन प्रोसेस कारताना फॉर्म सोबत Attachment म्हणून जोडावा लागेल आणि तरच तुम्ही स्वत जावून प्रत्यक्ष माहिती घेतली आहे असे गृहीत धरले जाईल .आणि तरच त्याचे पैसे तुम्हाला मिळतील.

**-चावडीचे वेंडर रजिस्ट्रेशन करतानी कोणत्याही एजन्सीच्या कर्मचाऱ्यांनी चुकीचे वागल्यास**

त्याला चावडी कंपनी जबाबदार राहणार नाही. इतर कोणतेही वाद, भांडणे, याच्याशी चावडी कंपनीचा काहीही एक संबंध राहणार नाही.

दुकानदाराकडे रजिस्ट्रेशन ला जातानी सकाळी सात ते रात्री नऊ या वेळेतच जावे. इतर कोणताही व्यवहार कायदेशीर बाबी सोडून खरेदी विक्री संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केल्यास चावडी जबाबदार राहणार नाही.

ही संपूर्ण विंडर रजिस्ट्रेशन प्रोसेस मोफत असल्या कारणाने कोणत्याही व्यक्तीने दुकानदाराकडून कोणत्याही स्वरूपात पैसे अथवा वस्तूची मागणी केल्यास त्याला चावडी कंपनी जबाबदार राहणार नाही. त्याला सर्वस्व एजन्सी धारक जबाबदार राहील व त्यावर कंपनीकडून कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

फ्री लिस्टिंग दुकानदार किंवा वेंडरचे रजिस्ट्रेशन करताना तुमच्याकडून कोणत्याही प्रकारचे शुल्क चावडी ट्रेनिंग अँड कन्सल्टन्सी प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीने घेतलेले नाही.

जर तुम्हाला सदर काम करताना कोणत्याही प्रकारचे प्रिंटिंग मटेरियल, आयडी कार्ड, ब्रोशर किंवा इतर कोणतेही सामान किंवा वस्तू कंपनीकडून हवी असल्यास त्याचे प्रत्येक वेळी जे शुल्क असेल आणि तो पाठवण्याचा खर्च असेल हा तुम्हाला तुमच्या वैयक्तिक खर्चाने करावा लागेल. त्याचे चार्जेस तुम्ही कंपनीमध्ये पेड केल्यानंतर मग या वस्तू तुम्हाला पाठवून दिल्या जातील.

वरील सर्व नियम व अटी तुम्हाला मान्य असतील व तुम्ही जर काम करण्यास इच्छुक असाल तर खाली दिलेल्या ई-मेल आयडी वरती तुम्हाला काम करायचे आहे असे कन्फर्मेशन मेसेज आम्हाला लवकरात लवकर पाठवा.

Email - chawadiadv2018@gmail.com

Contact No - 8830280315